Literacy for a Billion

Movie: Taani
Year: 2013

Song: Manat Yete Mahya
Lyricist: Sanjeev Kolte

मनात येते माह्या
मनात येते माह्या
हं....
मनात येते माह्या
लय उंच उंच उडावं
मनात येते माह्या
लय उंच उंच उडावं
मंग झोका करून इंद्रधनूचा
खूप खुप झुलावं
मंग झोका करून इंद्रधनूचा
खुप खुप झुलावं
पाय रोवूनी जिमीनीवर
आभाड मुठीत घ्यावं
पाय रोवूनी जिमीनीवर
आभाड मुठीत घ्यावं
मंग झोका करून
मंग झोका करून इंद्रधनूचा
खुप खुप झुलावं
आई अंबे जगदंबे
आई अंबे जगदंबे माय
अंबे जगदंबे
आई अंबे जगदंबे
उधं उधं उधं
उधं उधं उधं हा...

महादेवा जातो गं
अगं या आसमात
आन् पुहा भक्ताईचा चालला
जाऊ महादेवाच्या भेटीले

हर बोला
हर हर महादेव

भोळासांब बाप माह्य
शंकर त्याचं नाव
रगत सांडते रात्र न् दिन ती
गिरीजामाई माय
हं... भोळासांब बाप माह्य
शंकर त्याचं नाव
रगत सांडते रात्र न् दिन ती
गिरीजामाई माय
भन चिमुकली शकुली
परशा डांबरट मोठा भाव
हो हो हो हो
भन चिमुकली शकुली
परशा डांबरट मोठा भाव
आन् सपान बघतो हो...
आन् सपान बघतो
माह्या बाप म्या खुप खुप शिकावं
आन् सपान बघतो
माह्या बाप म्या खुप खुप शिकावं
आई अंबे जगदंबे
आई अंबे जगदंबे

आकाशाच्या चंदामामा
गुपित सांगते तुला
जाऊन हळूच सांग तू मामा
देवाच्या देवाला
आकाशाच्या चंदामामा

PlanetRead

Literacy for a Billion

गुपित सांगते तुला
जाऊन हळूच सांग तू मामा
देवाच्या देवाला
काट्यावरती चालंन मी
रान जीवाचं करंन मी
काट्यावरती चालंन मी
रान जीवाचं करंन मी
खुप शिकून देवा आ...
खुप शिकून देवा
वाटं खुप मोठं व्हावं
खुप शिकून देवा
वाटं खुप मोठं व्हावं
झोका करून इंद्रधनूचा
खुप खुप झुलावं
मंग झोका करून इंद्रधनूचा
खुप खुप झुलावं
मनात येते माह्या
लय उंच उंच उडावं
मंग झोका करून इंद्रधनूचा
खुप खुप झुलावं
पाय रोवूनी जिमीनीवर
आभाड मुठीत घ्यावं
मंग झोका करून इंद्रधनूचा
खुप खुप झुलावं
आई अंबे जगदंबे
आई अंबे जगदंबे माय
अंबे जगदंबे
आई अंबे जगदंबे
महादेवा जातो गं
अगं या आसमात
आन् पुहा भक्ताईचा चालला
जाऊ महादेवाच्या भेटीले
हर बोला
हर हर महादेव

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*